**खात्यामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व विषयांची यादी**

- 1. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान.
- 2. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)
- 3. रमाई आवास योजना
- 4. शबरी आदिवासी घरकुल योजना
- 5. आदिम (कातकरी) घरकुल योजना
- 6. पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना.
- 7. पंडीत दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना.
- 8. राष्ट्रीय रुरबन मिशन

# 1.राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान
# ( National Rural Livelihood Mission)

<table>
<tr><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th><th>अनुदान /फायदे</th></tr>
<tr><td>उद्देश- दारिद्र्याचे निर्मुलन करण्यासाठी ग्रामीण भागातील गरींबाना एकत्र आणुन, त्यांच्या सक्षम संस्था उभारणे , सदर संस्था मार्फत गरींबाना वितीय सेवा पुरविणे. गरींबांची व त्याच्या संस्थाची क्षमता वृध्दी व कौशल्यवृध्दी करणे आणि शाश्वत उपजिवीकेची साधने</td><td>- पालघर जिल्हयामध्ये सन 2013-14 या आर्थिक वर्षापासुन राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान Non Intensive व Semi Intensive या दोन कार्यपध्दतींनी राबविण्यात येत आहे.<br>- पालघर जिल्हयातील तालुक्यामधील ज्या गटातील (जिल्हा परिषद मतदार संघ) अनुसूचित जाती / जमाती तसेच दा.रे खालील कुटुबांची टक्केवारी इतर गटातील टक्केवारी पेक्षा जास्त होईल त्या जि.प गटाची निवड करुन त्यातील 2 गणांत (पंचायत समिती मतदार संघ) अभियान Semi Intensive कार्यपध्दतीने तर या व्यतिरिक्त उर्वरित</td><td>अनुदानाच्या बाबी व मर्यादा
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>अनुदानाच्या बाबी</th><th>किमान मर्यादा</th><th>कमाल मर्यादा</th><th>ठकळ बाबी</th></tr>
<tr><td>1</td><td>फिरता निधी</td><td>रु.10000</td><td>रु.15000</td><td>स्वयंसहाय्यता गटांना श्रेणी करणानेतर समुहांना अनुज्ञेय</td></tr>
<tr><td>2</td><td>व्याज अनुदान</td><td>नाही</td><td>रु. 3.00 लक्ष पर्यत कर्ज रकमेवर</td><td>केंद्र शासनाकडुन स्वयंसहाय्यता गटांना बँक व्याजदर व 7% व्याजदर यामधील तफावती एवढे व्याज अनुदान अनुज्ञेय</td></tr>
<tr><td>3</td><td>समुह बांधणी निधी (एकवेळ)</td><td>-</td><td>रु. 10000/-</td><td>SHG स्थापना व बांधणी निधी</td></tr>
<tr><td>4</td><td>क्षमता बांधणी निधी/ व्यक्ती</td><td>-</td><td>रु.7500/-</td><td>प्रति व्यक्ती/ प्रति वर्ष</td></tr>
</table>
- Semi-Intensive व Non-Intensive कार्यपध्दतीमध्ये भांडवली अनुदान बंद करण्यात आले आहे<br><br>व्याज अनुदान तरतुद :<br><br>- NRLM अंतर्गत किमान 70 % सदस्य दारिद्रय रेषेखालील असलेल्या महिलांच्या गटांना व्याज अनुदान अनुज्ञेय व देय राहील. यापुर्वी घेतलेल्या कर्जावर भांडवली अनुदान मिळालेले असल्यास अशा कर्जाच्या शिल्लक रक्कमेच्या परतफेडीवर व्याज अनुदान देता येणार नाही.<br><br>तथापि, संपूर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर रु. 3.00 लक्षच्या मर्यादेत नव्याने घेतलेल्या कर्ज रक्कमेवर व्याज अनुदान देय राहील.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| उपलब्ध करुन देऊन त्यांना दारिद्रयाच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. | क्षेत्रात Non Intensive कार्यपध्दतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.<br>- सन 2016-17 या आर्थिक वर्षात Semi Intensive कार्यक्षेत्रात नवीन स्वयंसहाय्यता समुह स्थापन करण्यात यावे परंतु **Non Intensive** कार्यक्षेत्रात कोणतेही नवीन स्वयंसहाय्यता समुह अथवा त्यांचे संघ स्थापन करण्यात येवु नये.<br><br>• अभियानातील प्रमुख टप्पे<br><br>1. स्वयंसहाय्यता गटांचे श्रेणीकरण व बळकटीकरण<br>- अ श्रेणी -नियमित समुह<br>- ब श्रेणी - अनियमित समुह<br>- क श्रेणी - बंद / निष्क्रीय समुह<br>दशसुत्री पालन : सध्या अस्तिवात असलेल्या उपरोक्त अ , ब, क श्रेणी तील गटांना दशसुत्रीचे प्रशिक्षण देऊन .त्यांना आर्थिक सवलती मिळणेस पात्र करणे<br>2. स्वयंसहाय्यता समुहाच्या सदस्यांची क्षमता बांधणी व प्रशिक्षण: स्वयंसहाय्यता समुहाच्या सदस्यांना दशसुत्रीचे पालन, पायाभुत व कौशल्य | - केंद्र शासन समुहानां बँकामार्फत 7% दराने कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. बँकदर व 7% यामधील तफावती एवढी रक्कम केंद्र शासन व्याज अनुदान म्हणून उपलब्ध करुन देणार आहे.<br><br>- स्वयंसहाय्यता गटांना रु.3.00 लक्षच्या मर्यादेत घेतलेल्या बँक कर्ज रक्कमेवर परत फेडीच्या प्रमाणात व्याज अनुदान देण्यात यावे. या मर्यादेत स्वयंसहाय्यता गटांना कितीही वेळा घेतलेल्या बँक अर्थसहाय्यावर व्याज अनुदान अनुज्ञेय व देय राहील. |

| | | |
|---|---|---|
| | विषयक प्रशिक्षणाव्दारे स्वत:हच्या कुटंबाचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी सक्षम बनविणे<br>3.. स्वयंसहाय्यता गटांना अर्थसहाय्य कार्यपध्दती : दशसुत्रीचे पालन करणा-या व फिरता निधी न मिळालेल्या नियमित (अ श्रेणी पात्र) स्वयंसहाय्यता गटांना प्रथम फिरता निधी उपलब्ध करुन देणे.<br><br>• - पहिले अर्थसहाय्य : व्दितिय श्रेणीकरणानंतर पात्र स्वयंसहाय्यता गटाच्या एकुण बचतीच्या 4 ते 8 पट, किंवा रु . 50000/- हजार यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढे<br>• - दुसरे अर्थसहाय्य : : पहिले अर्थसहाय्याची संपुर्ण परतफेड करणा-या स्वयंसहाय्यता गटाच्या बचतीच्या 5 ते 10 पट, किंवा रु . 1.00 लक्ष यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढे<br>• - तिसरे अर्थसहाय्य : | |

| | | |
|---|---|---|
| | दुसरे अर्थसहाय्य 90% किंवा त्यापैक्षा अधिक रक्कमेची परतफेड केल्यांनतर स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखडयाच्या (Activity) किंमतीनुसार किंवा किमान रु. 2 ते 5 लक्ष रक्कमे एवढे<br>• - चौथे अर्थसहाय्य : तिसरे अर्थसहाय्य 90% किंवा त्यापैक्षा अधिक रक्कमेची परतफेड केल्यांनतर स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखडयाच्या (Activity) किंमतीनुसार किंवा किमान रु. 5 ते 10 लक्ष रक्कमे एवढे | |

- **सुमतीबाई सुकळीकर उदयोगिनी महिला सक्षमीकरण योजना -**

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मजिअ-2016/प्र.क्र.31/योजना-3 दिनांक 14 ऑक्टोबर 2016.

उपरोक्त विषयान्वये राष्ट्रीय राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणा-या, केंद्रशासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना सवलतींच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून सुमतीबाई सुकळीकर महिला उदयोगिनी सक्षमीकरण योजना सुरु करण्यात आली आहे.

NRLM अंतर्गत प्रवर्ग 1 मधील जिल्हयातील महिला स्वयंसहाय्यता समुहांना बँकेमार्फत 7% व्याजदर आकारण्यात येतो नियमित परतफेड करणा-या स्वयंसहाय्यता समुहांना केंद्रशासनाकडून 3% व्याज अनुदान प्राप्त होते अशा स्वयंसहाय्यता समुहाला 4% व्याज अनुदान राज्यशासनाकडून देण्यात येईल.

**योजना राबविण्या-या यंत्रणा:-**

- 1. जिल्हास्तर - मा. प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर
- 2. तालुकास्तर - गट विकास अधिकारी , तालुका पंचायत समिती कार्यालय
- 3. गाव - ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय

## 2. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) :-

| उद्देश :- | योजनेचा तपशील :- | अनुदान व फायदे :- |
|---|---|---|
| 1. सामाजिक आर्थिक व जात निहाय गणना 2011 नुसार ग्रामसभेने पात्र केलेल्या प्रपत्र ब मधील लाभार्थींना निवारा उपलब्ध करुन देणे.<br><br>2. उद्दिष्टांचे 60 % अनुजाती / जमातीसाठी व 40% इतर लाभार्थी तसेच 15 % अल्पसंख्यांक लाभार्थी व 3 % अपंग लाभार्थींना राखीव<br>3. घरकुलामध्ये शौचालय असणे आवश्यक | 1. सामाजिक आर्थिक व जात निहाय गणना 2011 नुसार ग्रामसभेने पात्र केलेल्या प्रपत्र ब मधील असावा.<br><br>2.यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>3. नैसर्गिक आपत्ती, अपंग, परित्यकत्या, घटस्फोटीत, माजी सैनिक व युध्दात वीरगती प्राप्त झालेल्याच्या कुटूंबांची प्राधान्यक्रमाने निवड. (SECC - 2011 मधून निवड) | 1.सदर योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून 60 % अनुदान व राज्य शासनाकडून 40% अनुदान प्राप्त होते केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुलांची किंमत रक्कम रु. 1,20,000/- व अति दुर्गम,डोंगराळ व नक्षलवादी भागाकरिता 130,000/- निश्चित करण्यात आलेली आहे. रक्कम रु. 120,000/- पैकी नवीन घरकुलाच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते यामध्ये<br>* या मध्ये केंद्र शासनाचा अनुदान हिस्सा 60%<br>* या मध्ये राज्य शासनाचा अनुदान हिस्सा 40%<br>घरकुलाची रक्कम :- 120,000/- वरील अनुदान हे PFMS प्रणालीव्दारे लाभार्थीच्या बँक खातेवर जमा करता येते.<br><br>4.घरकुलाचे बांधकाम कमीत कमी 25 चौरस फुट क्षेत्रफळ. वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे (2017-18 पासून)<br>5.घर मंजुर करताना पहिला हप्ता अग्रीम रु. 25,000/-, दुसरा हप्ता रु. 30,000/-, तिसरा हप्ता रु. 30,000/-, चौथा हप्ता रू. 25000/-, पाचवा हप्ता रु. 10,000/-<br><br>6. घरकुल बांधकाम पूर्ण वेळी शौचालयाचे देखील बांधकाम |

| | | |
|---|---|---|
| 4 . घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक<br>5.ज्या लाभार्थीकडे स्वत:ची जागा उपलब्ध नाही अशा लाभार्थींना स्वत:ची जागा संपादित करणे कामी प्रति लाभार्थीस प्रचलित जागेची किंमत किंवा रुपये 50,000/- यापेक्षा जी रक्कम रास्त राहील ती रक्कम पंडीत दिन दयाळ उपाध्याय योजना मधून लाभ देणे आहे. (सदर जागा खरेदी व्यवहारीची दस्त नोंदणी आवश्यक आहे 10,000/-)<br><br>* मजुरीसाठी MGNREGA ची सांगड घालुन प्रतिदिन 201 रु प्रमाणे 90 दिवसाची मजुरी नरेगा विभागामार्फत देण्यात येते. | | करावे लागते. |

## 3.रमाई आवास योजना:-

| उद्देश :- | योजनेचा तपशील :- | अनुदान व फायदे :- |
|---|---|---|
| 1.राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्याच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देणे.<br><br>2. वार्षिक उत्पन्न एक लाखा पेक्षा कमी आहे अशा लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे.<br><br>3. घरकुलामध्ये शौचालय असणे आवश्यक<br>4 . घरकुल. बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक.<br><br>* मजुरीसाठी MGNREGA ची सांगड घालुन प्रतिदिन 201 रु प्रमाणे 90 दिवसाची मजुरी नरेगा विभागामार्फत देण्यात येते. | 1. लाभार्थी अनुसूचित जातीमधील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील असावा.<br><br>2. वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असावे.<br><br>3.लाभार्थी निवड ग्रामसभेव्दारे केली जाते.यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>4.त्यांचे स्वताचे पक्के घर नसावे. | 1.सदर योजनेतंर्गत राज्य शासनाकडून 100% अनुदान प्राप्त होते. नवीन घरकुलाच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते यामध्ये<br>* अशी घरकुलाची एकुण किंमत रक्कम रुपये 1,20,000/-<br>*घरकुलाचे बांधकाम कमीत कमी 25 चौरस फुट क्षेत्रफळ.<br>वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे (2017-18 पासून)<br><br>* घर मंजुर करताना पहिला हप्ता अग्रीम रु. 25,000/-, दुसरा हप्ता रु. 30,000/-, तिसरा हप्ता रु. 30,000/-, चौथा हप्ता रू. 25000/-, पाचवा हप्ता रु. 10,000/- |

## 4. शबरी आदिवासी घरकुल योजना:-

| | | |
|---|---|---|
| उद्देश :-<br>1.राज्यातील अनुसूचित जमाती घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्याच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देणे.<br>2. अनुसूचित जमाती मधील लाभार्थी दारिद्रय रेषेखाली असावा. व वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे अशा लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे.<br><br>3. घरकुलामध्ये शौचालय असणे आवश्यक.<br>4 . घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक.<br><br>* मजुरीसाठी MGNREGA ची सांगड घालुन प्रतिदिन 201 रु प्रमाणे 90 दिवसाची मजुरी नरेगा विभागामार्फत देण्यात येते. | योजनेचा तपशील :-<br>1. लाभार्थी अनुसूचित जमातीमधील कुटूंबातील असावा. परंतु ज्याचे नाव SECC 2011 मध्ये नाही त्यांच्यासाठी ही योजना आहे.<br><br>2.लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असावे.<br><br>3. यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br><br>4. ग्रामसभेव्दारे निवड केली जाते. | • अनुदान व फायदे :-<br>1.सदर योजनेतंर्गत राज्य शासनाकडून 100% अनुदान प्राप्त होते रु. 1,20,000/- नवीन घरकुलाच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते यामध्ये<br>*घरकुलाचे बांधकाम कमीत कमी 269 चौरस फुट क्षेत्रफळ.<br>वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे (2017-18 पासून)<br>*घर मंजुर करताना पहिला हप्ता अग्रीम रु. 25,000/-, दुसरा हप्ता रु. 30,000/-, तिसरा हप्ता रु. 30,000/-, चौथा हप्ता रू. 25000/-, पाचवा हप्ता रु. 10,000/- |

## 5. आदिम (कातकरी) घरकुल योजना -

| | | |
|---|---|---|
| उद्देश :-<br>1.राज्यातील अतिभागात असणा-या आदीम जमातीसाठी यातील कातकरी, कोलाम इ. जातीमधील घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्याच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देणे.<br><br>2. वार्षिक उत्पन्न एक लाखा पेक्षा कमी आहे अशा लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे.<br><br>3. घरकुलामध्ये शौचालय असणे आवश्यक<br>4 . घरकुल. बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक.<br><br>* मजुरीसाठी MGNREGA ची सांगड घालुन प्रतिदिन 201 रु प्रमाणे 90 दिवसाची मजुरी नरेगा विभागामार्फत देण्यात येते. | योजनेचा तपशील :-<br>1. लाभार्थी अनुसूचित जातीमधील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील असावा.<br><br>2. वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असावे.<br><br>3.लाभार्थी निवड ग्रामसभेव्दारे केली जाते.यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>4.त्यांचे स्वताचे पक्के घर नसावे. | • अनुदान व फायदे :-<br>1.सदर योजनेतंर्गत राज्य शासनाकडून 100% अनुदान प्राप्त होते. नवीन घरकुलाच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते यामध्ये<br>* अशी घरकुलाची एकुण किंमत रक्कम रुपये 1,20,000/-<br>*घरकुलाचे बांधकाम कमीत कमी 25 चौरस फुट क्षेत्रफळ.<br>वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे (2017-18 पासून)<br>* घर मंजुर करताना पहिला हप्ता अग्रीम रु. 25,000/-, दुसरा हप्ता रु. 30,000/-, तिसरा हप्ता रु. 30,000/-, चौथा हप्ता रू. 25000/-, पाचवा हप्ता रु. 10,000/- |

**6. पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना.**

ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक इंआयो/2015/प्र.क्र.200/यो-10 दिनांक 30/12/2015 अन्वये सन 2015-2016 पासून दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना केंद्र शासन रक्कम रुपये 10,000/- व राज्य शासन रक्कम रुपये 40,000/- असे एकुण रक्कम रुपये 50,000/- जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य असून जागेचे क्षेत्र पति लाभार्थी 500 चौरस फुट असलेली जागा लाभार्थीच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर घरकुल बांधकामास मान्यता घेतल्यानंतर घरकुल बांधकामासाठी अनुदान अनुज्ञेय आहे.

मोठया ग्रामपंचायतीमध्ये 500 चौरस फुटापर्यंत 2 किंवा 3 लाभार्थींच्या संमतीने दोन मजली (G+1) किंवा तीन मजली (G+2) बांधण्यासाठी प्रती लाभार्थी रक्कम रुपये 50,000/- एवढे अर्थसहाय्यास अनुज्ञेय आहे.

### 7. पंडीत दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना-:

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, सिडको भवन, नवी मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक Umed/MSRLM/JP & SD/जा.क्र. 1/2016 दिनांक 1/1/2016 अन्वये राबविण्यात येत आहे.

**उदिदष्ट -**

ग्रामीण भागातील गरीब कुटूंबातील 18 ते 35 वयोगटातील युवक/युवतींना कमी कालावधीचे (तीन महिने) प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार देणे.

**लाभार्थी -**

1. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटूंबातील युवक, युवतींना प्रथम प्राधान्य.
2. 3 -या व 4 थ्या श्रेणीतील कर्मचारी यांचे कुटूंबीय अनुकंपा योजनेअंतर्गत शासकीय नोकरीच्या प्रतिक्षा यादीमध्ये त्यात प्राधान्य.
3. एकल महिलांच्या कुटूंबातील युवक व युवती विशेषत: दुर्बल घटकांतून उदा. भटके, विमुक्त, अनुसूचित जाती, जमाती व इतर
4. रोजगार हमी योजनेमध्ये मागील वर्षात ज्या कुटूंबांनी 100 दिवसांहून अधिक काम केले आहे अशा कुटूंबातील युवक / युवतींना प्राधान्य.
5. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाशी जोडलेल्या सर्व स्वयंसहाय्यता समूहाच्या सदस्यांच्या कुटूंबातील युवक / युवती.

## 8. राष्ट्रीय रुरबन मिशन -

सन 68 च्या जनगणनेनुसार भारतात एकूण ग्रामीण लोकसंख्या ही शहरी लोकसंख्येच्या तुलनेत 2011% आहे. त्यानुसार आजमितीस ग्रामीण भागातील लोकसंख्या एकूण 833 दशलक्ष एवढी आहे. सन 2001-2011 या काळात सुमारे 12% ग्रामीण लोकसंख्येमध्ये वाढ झालेली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता भारत सरकारने श्यामा प्रसाद मुखर्जी RURBAN अभियान (SPMRM) राबविण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर अभियान राज्यामध्ये राबविण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

अभियानाची उदिष्टे -

सदर अभियानाअंतर्गत ग्रामविकास हा रुरबन समुहाच्या माध्यमाने करण्यात येईल. यामध्ये संपूर्ण देशातील ग्रामीण भागातील गावांच्या समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करणे आणि शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविणे अपेक्षित आहे. या अभियानाची उदिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- ग्रामीण व शहरी भागातील विकासाचा असमतोल दूर करणे. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक व तांत्रिक सोयी सुविधा ग्रामीण भागामध्ये उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.
- ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करताना, गरीबी व बेरोजगारी कमी करणे.
- अभियानांतर्गत निवडलेल्या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणे.
- ग्रामीण भागातील गुंतवणुकीस चालना देणे.

सदरची उदिष्टे साध्य करुन या गाव समुहांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजना व राज्य शासनाच्या योजना या नियोजनबध्द पध्दतीने, एककेंद्राभिमूख रितीने व विशिष्ट कालमर्यादेत या गाव समुहांमध्ये राबविणे अपेक्षित आहे.